जा. क्र. आस्था/रजा/ 3873/09
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय,
८३, डॉ. ॲनी बझंट रोड, वरळी,
मुंबई ४०० ०१८

दिनांक २१/७/०९.

## परिपत्रक क्र. ३५२

मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक १९६, २०४, २१० व २४५ नुसार कार्यालयातील कर्मचारी वैद्यकिय कारणासाठी तसा दाखला जोडून किंवा रजेच्या अर्जात अन्य सबळ कारण देऊन संबंधित अधिकाऱ्याचे पूर्व परवानगीने अर्जित /परिवर्तीत रजा घेतली जावी. त्याचप्रमाणे नैमितीक रजा ही अचानक व टाळता येणार नाही अशाच प्रसंगी घ्यावी क्षुल्लक कारणासाठी नैमितीक रजा संपवू नये अशा स्पष्ट सुचना दिलेल्या आहेत.

तरीसुध्दा असे निदर्शनास आले आहे की, या कार्यालयातील बरेचसे कर्मचारी पूर्व परवानगी शिवाय रजा उपभोगतात व रजा उपभोगून परत आल्यावर रजेचे अर्ज सादर करतात. काही कर्मचारी त्यांना शक्य असूनही पूर्व परवानगीने रजा उपभोगत नाही. तसेच रजेवर जाण्याचे प्रमाण वाढलेले आहे. त्यामुळे कार्यालयीन कामात विस्कळीतपणा आला आहे. तसेच कार्यालयातील अन्य उपस्थितीत राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर विनाकारण अतिरिक्त कामाचा ताण पडत आहे.

तरी, कार्यालयीन शिस्तीच्या दृष्टीने सर्वच कर्मचाऱ्यांनी अत्यावश्यक असेल त्यावेळी रजेचा अर्ज देऊन पूर्व परवानगीने रजा मंजुरीनंतरच त्यांच्याकडील कामाची माहिती इतर कर्मचाऱ्यास सोपवून रजेवर जावे.

सर्व कर्मचाऱ्यांनी वरील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे. याबाबत कसूर केल्यास संबंधित कर्मचाऱ्यावर योग्य ती कायदेशिर कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

धर्मादाय आयुक्त, (प्र)
महाराष्ट्र राज्य, मुंबई